# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३०४/२०२४ दिनांक- १६/०८/२०२४.

## “७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधुन १५ ऑगस्ट २०२४ रोजी तुळींज पोलीस ठाणे प्रॉपर्टी मिसींग मधील एकुण ४,००,०००/- रुपये किंमतीचे ३० मोबाईल फोन तक्रारदार यांना परत देवुन उल्लेखनिय कामगिरी केलेबाबत”

तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्तीचे तसेच गर्दीचे ठिकाणे असुन, दैनंदिन कामाचे घाईगडबडीमध्ये रेल्वे स्टेशन परिसर तसेच सेंट्रल पार्क, ओसवाल नगरी आठवडा बाजार येथे लोकांचे मोबाईल फोन गहाळ झालेबाबत पोलीस ठाणे तसेच ऑनलाईन तक्रारी प्राप्त होत असतात. मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तुळींज पोलीस ठाणेत दाखल प्रॉपर्टी मिसींगमधील गहाळ मोबाईल यांचा तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेवुन, १५ ऑगस्ट २०२४ रोजी ७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधुन, पोलीस ठाण्यात नाविण्यपुर्ण उपक्रम राबवुन प्रॉपर्टी मिसींग मधील विविध कंपन्यांचे एकुण ४,००,०००/- रुपये किंमतीचे एकुण ३० मोबाईल तक्रारदार यांना मा. वरिष्ठांच्या हस्ते परत दिले आहेत. सदर बाबत तक्रारदार यांनी त्यांचा गहाळ झालेला मोबईल फोन परत मिळाल्याने समाधान व्यक्त करून, पोलीसांचे कामगिरीचे कौतुक केले आहे.

सदरची कामगीरी श्रीम. पौर्णिमा चौगुले-श्रींगी पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. उमेश माने-पाटिल सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वपोनि/शैलेंद्र नगरकर, पोनि/सुधिर चव्हाण, पोनि/जितेंद्र पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/सुनिल पवार, सफौ/शिवानंद सुतनासे, पो.हवा/ आनंद मोरे, उमेश वरठा, राजेंद्र जाधव, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, पोशि/छपरीबन, राहुल कदम, शशिकांत पोटे तसेच पोलीस उपायुक्त कार्यालय परिमंडळ-०२ नेमणुकीतील पोहवा/बागुल, पोशि/ अमोल बर्डे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




